# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

दुपार

**दिनांक १७.०५.२०२६ रविवार**

**(कामगिरी)**

**नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक १६.०५.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये १९ केसेसमध्ये २० ईसमांवर कारवाई करून ८२,०९१/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०१ केसमध्ये ०१ ईसमावर कारवाई करून २०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,४०९ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,६९,३५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे गिट्टीखदान :— जिवे ठार मारणाऱ्या अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी विजय आनंद मदन वय ६३ वर्ष रा. प्लॉट क्र. ६८, गोविंद गौरखेडे कॉम्प्लेक्स, सेमिनरी हिल्स, गिट्टीखदान, नागपूर यांचे प्लॉट क्र. ६४, गोविंद गौरखेडे कॉम्प्लेक्स, येथील घरी मागील ०४ महिन्यापासून किरायाने एकटा राहणारा इसम नामे अजय किशोरीलाल श्रीवास वय ४० वर्ष रा. तेलीपुरा, सिताबर्डी, नागपूर ह.मु. फिर्यादीचे घरी किरायाने, यास दिनांक १६.०५.२०२६ चे १५.४० वा. चे सुमारास कोणीतरी अज्ञात आरोपीने, अज्ञात कारणावरुन, कोणत्यातरी धारदार शस्त्राने पोटावर वार करून, गंभीर जखमी करुन, जिवानिशी ठार केले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे पोउपनि जगन्नाथ शेरकर ७०५८८८८७७७ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम १०३(१) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध व पुढील तपास सुरु आहे.

**२) पोलीस ठाणे वाडी :— आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादीचा मुलगा नामे मनिष देवानंद देशभ्रतार वय ३४ वर्षे रा. प्लॉट क्र. ए—१, रघुपती नगर, वाडी, नागपूर याचा प्रेमविवाह १२ वर्षापुर्वी आरोपी सौ. पुजा मनिष देशभ्रतार हिचेसोबत झाला होता. त्यांना दोन मुले आहेत. मागील काही दिवसांपासून आरोपी ही फोनवर वेगवेगळया इसमांसोबत बोलत राहते त्यामुळे त्यांचे दोघात नेहमी वादविवाद व भांडण होत होते. दिनांक १४.०३.२०२६ रोजी आरोपी ही प्रणय नावाचे मुलासोबत घर सोडून पळून गेली होती. फिर्यादीचे मुलाने तिला विजयवाडा येथून घरी आणले असता ती माहेरी निघून गेली तसेच त्यांचे दोन्ही मुलांची जबाबदारी घेण्यास तयार नसल्याने फिर्यादीचा मुलगा मनिष हा नेहमी तणावात

राहत होता. आरोपीचे मानसिक त्रासाला कंटाळून फिर्यादीचे मुलाने दिनांक २०.०४.२०२६ रोजी राहते घरी सिलींग फॅनला दोरीने बांधून गळफास घेऊन आत्महत्या केली होती. पोलीस ठाणे वाडी येथे अकस्मात मृत्युची नोंद घेण्यात आली होती. अकस्मात मृत्युचे चौकशीत तसेच, फिर्यादी श्रीमती कविता देवांनद देशभ्रतार वय ५६ वर्षे यांनी आरोपीविरूध्द तक्रार दिली की, आरोपी हिने फिर्यादीचे मुलाचा मानसिक छळ करून त्यास आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाडी येथे पोउपनि. उत्तम जायभाये ९५५२५३८०९८ यांनी आरोपी विरूध्द कलम १०८ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>३) पोलीस ठाणे जुनी कामठी :— गोवंशीय जनावरांना निर्दयतेने व क्रुरपणे कत्तलीकरीता कोंडुन ठेवणाऱ्या आरोपीविरुध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक १६.०५.२०२६ चे १६.२५ वा. चे सुमारास, जुनी कामठी पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिति मिळाली की, पापाचा बगिचा, कमसरी बजार जवळील मैदानात, कामठी, नागपूर येथे गोवंशीय जनावरांना बांधून ठेवलेले आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून नमुद ठिकाणी जावुन पाहणी केली असता, तेथे १० गोवंशीय जनावरे यांना अत्यंत क्रुरपने व निर्दयतेने दाटीवाटीने कोंडून चारापाणी न देता कत्तलीकरीता बांधून ठेवलेले मिळुन आले. नमुद जनावरांचा मालकाबाबत माहिती काढली असता, जनावरे हे शेख नवाब वल्द शेख हफीज वय २३ वर्ष रा. जुनी खलाशी लाईन, हनुमान मंदीरजवळ, जुनी कामठी याची असल्याचे समजले. आरोपी याने नमुद गोवंशीय जनावरे यांना अवैधरित्या कत्तलीकरीता बांधुन ठेवल्याचे निष्पन्न झाले. घटनास्थळाहुन एकुण १० गोवंशीय जनावरे एकुण किंमती १,००,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गोवंशीय जनावरे यांना गौरक्षण केंद्र येथे दाखल करण्यात आले आहे. पोलीस ठाणे जुनी कामठी येथे पोउपनि. सागर भंडारी यांनी आरोपीविरूध्द कलम ५(ब),९(अ) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम—१९७६, सुधारणा कायदा १९९५, सहकलम ११(१)(ड) प्राणी क्रुरता अधिनियम—१९६० अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>पोलीस ठाणे नंदनवन</u> :—** निखिल अनंत पंचभाई वय २७ वर्षे रा. नंदनवन झोपडपट्टी, गली क्र. २, केडीके कॉलेजजवळ, नागपूर हे दिनांक ३०.०४.२०२६ रोजी पोलीस ठाणे नंदनवन हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **<u>वर्णन</u>** रंग—सावळा, चेहरा—गोल, बांधा—मध्यम, केस—काळे, अंगात— पांढरा चेकचा शर्ट व काळा जिन्सपॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.



निखिल

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**